सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/साधारण/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ८७ ठ. क्र. २६२ दि. २९/९/२०१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



आरोग्य विभागाकडील वैद्यकीय अधिका-यांचे मुदतवाढी बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावासोबतच्या तक्ता १ मधील अ.क्र. १ ते ७ मधील वैद्यकीय अधिकारी यांना दि. ३-७-२०१४ पासून अकरा महिन्याकरिता देण्यात आलेली मुदतवाढ ही दि. २-६-२०१५ रोजी संपुष्टात आलेली असल्याने व प्रस्तावात नमूद कारणास्तव अ.क्र. १ ते ५ मधील सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी व स्त्री वैद्यकीय अधिकारी एक यांना दि. ३-६-२०१५ व दि. ४-६-२०१५ रोजी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. ५-६-२०१५ पासून ११ महिन्याच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-७-१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. १६५ दि. १०-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा. स्थायी समितीच्या ठरावास अनुसरुन पगारवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे. परंतू अट अशी की, डॉक्टरांनी त्यांना ठरवून दिलेल्या वेळेमध्ये दवाखान्यामध्ये उपस्थित राहिले पाहिजे. प्रसुतिगृहाकडे जे डॉक्टर्स आहेत त्यांनी तेथे असलेल्या दवाखान्याच्या क्वॉर्टर्समध्ये राहिले पाहिजे. जर समजा ही अट त्या डॉक्टर्सना मान्य नसेल तर त्यांना कमी करुन नविन डॉक्टरांची भरती करण्यांत यावी. आरोग्याधिकारी यांनी याबाबत जातीने लक्ष द्यावे. तसेच दवाखान्याच्या प्रगतीसाठी कर्मचा-यांना ज्या ठिकाणी नेमणूक दिलेली आहे त्याच ठिकाणी त्यांना काम देण्यांत यावे. तसेच आरोग्य खात्याकडे रिक्त असलेल्या जागा भरण्यांत याव्यात.

नगरसचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ९८ ठ. क्र. १६३
दि. २९/७/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ पुरविण्यात येणा-या सेवेची निश्चित केलेल्या शुल्कास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर अध्यादेशास अनुसरुन मा.यांचे दि. १-७-२०१५ च्या बैठकीमध्ये दिलेल्या आदेशानुसार सहपत्र-अ मध्ये नमूद अ.क्र. ५ मध्ये थकबाकी नसल्याचा दाखला (NOC) देणेसाठी रुपये ११०/- अ.क्र. १० जोते प्रमाणपत्र देणेसाठी व भोगवटा प्रमाणपत्र देणेसाठी अनुक्रमे प्रति २५० चौ.मी. पर्यंत र.रु. ५००/- व २५१ चौ. मी. पासून र.रु. १०००/- इतकी निश्चित केलेली फी आकारणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. महानगरपालिकेची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-७-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. १६९ दि. १०-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ९९ ठ. क्र. २६४
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

९९

विद्युत विभागाकडील एकवट मानधनावरील श्री. विश्वनाथ अनगिरी सेवानिवृत्त इलेक्ट्रीक इंजिनिअर यांना मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव श्री. व्ही. आर. अनगिरे सेवानिवृत्त इलेक्ट्रीक इंजिनिअर यांना विद्युत विभागाकडील दैनंदिन कामकाजाकरिता दि. २-६-२०१५ पासून सहा महिन्याच्या कालावधी करीता ( दरमहा रु. ३२,८२३/- यावर ) मुदतवाढ देणेकामी सदर द्यावयाच्या मुदतवाढीस मा.मनपाची मान्यता आवश्यक असलेने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा.मनपाकडे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-७-१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्र. १७१ दि. १०-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~अमुली~~/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १०३ ठ. क्र. ९६५ दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अग्निशमन सेवा व आणिबाणी सेवेचे बळकटीकरण करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मंजूर विकास योजना आराखडा (१९९७-२०१७) नुसार अग्निशाम केंद्राकरिता बाळे येथील आ.क्र.११/६०, १.२० हेक्टर जागेचे भूसंपादन करण्याकामी एकूण रक्कम रु. ५६ लाख इतका खर्च येणार असल्याबाबत मा.प्र.सहा.संचालक नगर रचना सोलापूर महानगरपालिका यांनी कळविले असून सदर रक्कमेची तरतूद जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ सालामधून अग्निशमन सेवा व आणिबाणी सेवेचे बळकटीकरण या हेडमधून उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे निवेदन सादर करणेत आले होते. त्यास अनुसरुन मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांनी प्रस्तावात नमूद **१)** महानगरपालिकेचा ठराव **२)** जागेचा ७/१२ उतारा **३)** मंजूर आराखडयातील आरक्षणाबाबत पार्ट प्लॅन - मूळ प्रस्तावासोबत मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विकास आराखडयातील आरक्षणाबाबत पार्ट प्लॅन सादर करण्यात आले. **४)** इतर आवश्यक प्रमाणपत्र (इतर कोणताही योजनेतून सदर कामी अनुदान घेण्यात आले नाही) सदर कामी कोणताही योजनेमधून मदत घेण्यात आलेली नाही याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. या बाबीची पूर्तता करण्याविषयी कळविले आहे. सबब प्रस्तावात नमूद १ ते ४ बाबीपैकी २ ते ४ बाबीची पूर्तता करण्यात आली आहे. व १ नुसार महापालिकेचा ठराव जोडण्याविषयी कळविले आहे. बाळे स.नं. ५६ (भाग) व ५९ (भाग) ही जागा सोलापूर शहराचे सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र.११/६० फायर ब्रिगेड याकरिता आरक्षित असून विकास योजना अहवालानुसार सदर आरक्षणाचे क्षेत्र १.२० हेक्टर इतके जागेचे भूसंपादन करण्याकामी म.न.पा.सर्वसाधारण सभेची ठराव मंजूर होऊन मिळणे आवश्यक आहे. सदर बाळे स.नं. ५६ (भाग) व ५९ (भाग) ही जागा सोलापूर शहराचे सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र.११/६० फायर ब्रिगेड याकरिता आरक्षित जागेचे भूसंपादन प्रस्तावास मंजूरी व मान्यता मिळण्यास्तव सदरचा प्रस्ताव मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे ८-६-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मागील/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १०५ ठ. क्र. ९६६
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवला गेलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

नगरोत्थान राज्यस्तरीय योजने अंतर्गत रस्त्याच्या कामामध्ये (IR-14) पार्टमधील अमन चौक ते मदिना चौक या मधील इले.पोल (HT/LT) शिप्टींग करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीमधील सुधारणा नुसार मा. स्थायी समितीची प्रस्तुत प्रकरणास मानीव मान्यता मिळालेली असून प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १३-६-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १०९ ठ. क्र. १६७
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

आश्वासन क्र. २२९८ सन २००७ चे तिसरे अधिवेशन डॉ. कोटणीस यांचे निवासस्थान राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव डॉ. कोटणीस यांचे निवासस्थान राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची शिफारस केंद्र शासनास करावयाची आहे तेव्हा डॉ. कोटणीस यांचे निवासस्थांन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याचे शिफारस केंद्र शासनास करण्याचा प्रस्ताव पत्राच्या मसुद्यासह (इंग्रजी व मराठी) पाठवावा. अशी विनंती कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी केलेली आहे. त्या अनुषंगाने डॉ. कोटणीस यांचे निवासस्थान राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्याची शिफारस मा. केंद्र शासनास करण्याचे अनुषंगाने पत्राचा मसुदा तयार करण्यात आला असून सदर मसुदयास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी व मान्यतेअंती सदरचा मसुदा मा. अवर सचिव श्री. सु. ज्ञा. रेडेकर, कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचेकडेस पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे २४-६-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिकी/विशेष
सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र.११२ ठ. क्र.१६८
दि. २९/९/२०१५ रोजी झालेल्या खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

११२

प्र.क्र. २८ ब सिटी बस स्टेशन डेपो येथे महिला व पुरुष शौचालय बांधणे व हॉल दुरुस्ती करणे व ड्रेनेज कनेक्शन जोडणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव या कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. १४४ र.रु. ८,२५,३५५/- इतकी बजेट तरतूद उपलब्ध होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-७-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकातील भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. ७ ड्रेनेज लाईन घालणे व गटारी बांधणे या सदरातून बजेट तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्राथमिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९२७ ठ. क्र. ९६९
दि. २९/९/२०१५ रोजी ठवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



शहरांतील ठिकठिकाणचे नाले सुधारणा करणेकामी (फेज-१) प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे व सोबत जोडलेल्या नाला बांधणे या कामाचे सविस्तर प्लॅन,एस्टिमेंट डिझाईन प्रमाणे प्रस्तावात नमूद कारणास्तव नाला क्र.१ - होटगी रोड क्रॉसिंग मुलतानी बेकरी लगत ते दक्षिण मध्ये रेल्वे पुल प्रभाग क्र.४९ कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.- र.रुपये ३४६.५५, नाला क्र.२ -जुना पुना नाका ते १४ कमान ब्रिज येथे रेल्वे क्रॉसिंग येथे नाला ट्रेनिंग सुधारणा करणे प्रभाग क्र.९,११ व १२ र.रुपये ७०७.५७, नाला क्र.३ - शरदचंद्र पवार प्रशाला ते वसंत विहार ते जुना पुना नाका येथे ना अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी.एरिया नाला येथे नाला ट्रेनिंग सुधारणा करणे.(भाग-१) ला ट्रेनिंग सुधारणा करणे. प्रभाग क्र.१२ र.रुपये ९८.९१, नाला क्र.४ - वज्रेश्वर नगर ते प्रभाग क्र.२० ा शिंदे ते इंदिरा गांधी नगर विडी घरकुल येथे नाला ट्रेनिंग सुधारणा, नाला र.रुपये २७५.७४, नाला क्र.५ - अक्कलकोट रोड ते सोनिया नगर जंक्शन येथील वज्रेश्वर नगर भाग-२ येथे नाला ट्रेनिंग सुधारणा करणे. प्रभाग क्र.१७,१८,१९ र.रुपये २४८.७० डे नगर ते संभाज्क्र.६ - केक करणे, प्रभाग क्र.१८, र.रुपये ८०१.७७, नाला क्र.७ - NH- १३ लगत नम्रता हौसिंग सोसायटी विजापूर रोड ते सिध्देश्वर वन विहार प्रताप नगर रोड, प्रभाग क्र.४८ र.रुपये २१६.९७, नाला क्र.८ - हनुमान नगर खड्डा नाला ते भगवान नगर येथे नाला ट्रेनिंग सुधारणा करणे, प्रभाग क्र.२२,र.रुपये ४२.७२ नाला क्र.९ - मडकी वस्ती ते बालाजी नगर सिडी वर्क व पावसाळी गटार करणे प्रभाग क्र.९ र.रुपये १३९.७२, नाला क्र.१० - जुना कुमठा नाका ते अंत्रोळीकर नगर सिडी वर्क व पावसाळी गटार करणे, प्रभाग क्र.४२ र.रुपये २४७.५८, नाला क्र.११ - निर्मिती नगर रामलिंग नगर ते पटवर्धन चाळ येथे नाला ट्रेनिंग सुधारणा करणे. प्रभाग क्र.२९,४७ र.रुपये २९१.५३, नाला क्र.१२ - निलम नगर ते शांती नगर येथे नाला करणे, प्रभाग क्र.३९,४० र.रुपये ६२०.४३, नाला क्र.१३ - सोमय्या नगर ते स्वागत नगर ते देसाई नगर सिडी वर्क व पावसाळी गटार करणे, प्रभाग क्र.४०,४१ र.रु ५१३.८० नाला क्र.१४ - विजय नगर ते दिक्षित नगर ते शोभा नगर येथे सिडी वर्क व पावसाळी गटार करणे, प्रभाग क्र.४१ र.रुपये १८३.१३ असे एकुण नाला क्र. १ ते १४ नाल्यांचे सुधारणा करणेचे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.- / २०१५-१६ र.रुपये ४७३३.१७ लाखाचा तयार करण्यात आला असून प्रकरणी प्राधान्यक्रम निश्चित होवून मिळणे व त्यानुसार त्या कामासाठी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध होणे तसेच या कामासाठी सन २०१४-१५ मध्ये उपलब्ध तरतूद व्यतिरिक्त राहिलेली कामे भविष्यात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना जिल्हास्तर अथवा इतर शासकीय निधीतून तसेच म.न.पा.चे पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकीय तरतूदीतून घेणेस किंवा आवश्यकता भासलेस म.न.पा.हिस्सा तरतूद म्हणून करणेस तसेच सदर पूर्वगणनपत्रकास मा.स्थापत्य समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ०५.६.२०१५ चे आलेल्या टिपणीनुसार मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २६, दिनांक १४-७-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. मा. शासनाकडून ९० टक्के व महानगरपालिका १० टक्के निधी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच या व्यतिरिक्त सोलापूर शहर व हद्दवाढ येथे जे नाले सुधारणा करणेचे आहेत. अशा सर्व नाल्यांचे प्लॅन व एस्टीमेट तयार करुन सक्षम मान्यता घेणेसाठी संपूर्ण अहवालासह मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १२८ ठ. क्र. १५०
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सिध्देश्वर काठी मार्ग व लोकमान्य गणेशोत्सव व नवरात्र महोत्सव मिरवणुक मार्गावरील ओव्हर हेड वायर काढून अंडरग्राऊंड केबल घालणे (दुसरा टप्पा) कामाचे प्रस्तावात नमुद कारणास्तव तयार करण्यात आलेले पुर्वगणनपत्रक र.रु ७९,५१,२३९/- यांस मा.स्थापत्य समितीची मान्यता मिळून मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि. १३-०६-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २७ दिनांक १४-७-१५ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१३२ ठ. क्र. ९६९
दि. २९।७।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नेहरु नगर येथील शासकीय मैदानामध्ये विविध सुविधा करणे कामी प्रस्तावात नमुद प्रमाणे फेज-१ मध्ये १)गेट करणे (२ नग) र.रु.२,८१,७९०/-, २) कंम्पाऊड वॉल चेनलिंक-फेन्सींग सह र.रु.१४,६१,३५३/-, ३) रनिंग ट्रक व साईड ड्रेन र.रु.२६,९६,८७५/-, ४) जॉगिंग ट्रॅक व प्लॅनिटेशन र.रु.२४,६२,८६०/-, ५) खो-खो मैदान तयार करणे र.रु.२,३५,६०७/- ६) बॉस्केट बॉल मैदान तयार करणे.र.रु.८,४१,२०१/- ७) कब्बड्डी मैदान तयार करणे र.रु.७१,९९४/- ८) हॉलीबॉल मैदान तयार करणे र.रु.१,२०,५७३/- ९) टॉयलेट ब्लॉक बांधणे र.रु.१०,३९,८८३/- १०) वॉटर टॅक, बोर, पंप व्यवस्था करणे र.रु ८,६९,६२४/- असे एकुण र.रु.९५,८०,९६१ फेज -२ प्रस्तावात नमुद प्रमाणे १) टॉयलेट ब्लॉक बांधणे र.रु.१३,२७,४८७/- २) शेट बांधणे र.रु.६,४१,४३८/- ३) व्यायाम शाळा बांधणे र.रु.४३,४६,०८६/- ४) पार्किग ऐरिया करणे र.रु. ८,०९,४०५/- ५) अंतर्गत रस्ते करणे र.रु.५,०७,७८९/- ६) लॉन करणे र.रु.१२३५/१५३/- ७) छोटा पुल बांधणे र.रु.२,५४,९३८/- असे एकुण र.रु.८८,६७,३६०/- असे एकुण फेज क्र.१ व फेज क्र.२ कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २१ / सन २०१५-१६ र.रु.२,०६,६२,११९/- यांस मा.स्थापत्य समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक १३/०६/२०१५ चे टिपणीप्रमाणे मा.स्थापत्य समिती ठराव क्र. ४२, दिनांक १४-७-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

संपूर्ण माहितीसह प्रकरण १५ दिवसांत मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९३३ ठ. क्र. ९१०२
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

बाळे स्मशानभुमी गट नं. ५४३ पैकी जागेत विविध सुधारणा करणे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तपशिल अ.क्र.१ ते ६ १) पाण्याची टाकी र.रु. १,४६,४६५/- २) बर्निंग शेड र.रु. १०,७३,८८७/- ३) बोर र.रु. ८६,०९२/-४) वेटिंग शेड र.रु. १२,५८,९४७/- ५) इलेक्ट्रिफिकेशन र.रु.१,४५,१४०/-६) अंतर्गत रस्ते र.रु. ३,३९,०३८/- असे एकुण कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.२३ / र.रु. ३५,१०,७०५/- यांस मा.स्थापत्य समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळुन सदरीस बजेट तरतुद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१/०७/२०१५ चे टिपणीप्रमाणे मा.स्थापत्य समिती ठराव क्र. ४४ दिनांक १४-७-१५ चे शिफारसीप्रमाणे स्मशानभूमी सुधारणा या हेड सदराखाली तरतूद उपलब्ध करण्यास मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यातील अ.क्र.२२ स्मशानभूमी सुधारणा करणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

बालापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण वर्षेगुंदे विषय क्र. ज 934 ठ. क्र. 2403
दि. 29/9/2015 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१३५

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे LED लाईट व विद्युत कामे करणे प्रस्तावात नमुद कामाकरिता सुधारीत पूर्वगणनपत्रक क्र./ र.रु.२४,०१,५०१/- यांस मा.स्थापत्य समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेची मा.आयुक्त यांचे दि.०१/०७/२०१५ चे टिपणीनुसार मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ५०, दिनांक १४-७-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
बालापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ११८ ठ. क्र. १६४
दि. २८/८/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरात अनेक ठिकाणी खाजगी नागरी सोसायटया व शाळा आहेत. या सोसायटयामध्ये सोलापूर शहरातील लाखो लोक राहतात. तसेच शहरात असलेल्या खाजगी शाळेमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिकेच्या वतीने अशा नागरी सोसायटयामध्ये व खाजगी शाळांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत जरुरीचे आहे. खाजगी सोसायटयामध्ये राहणारे नागरिक हे महानगरपालिकेला प्रॉपर्टी टॅक्स व पाण्याचे टॅक्स भरीत असतात.

परंतू त्यांना म.न.पा.च्या वतीने पुरेशा नागरी सुविधा मिळत नाही. सध्या पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. अशा वेळेला अशा खाजगी नागरी सोसायटयामध्ये व खाजगी शाळेमध्ये पुरेशा पाण्याची सोय महानगरपालिकेच्या वतीने होत नाही. ड्रेनेज, स्वच्छता इत्यादी सुविधा देण्याची जबाबदारी मुंबई प्रांतिक महाअधिनियम प्रमाणे महानगरपालिकेची आहे. पाण्याची टंचाई असल्याने शहरातील खाजगी नागरी सोसायटयामध्ये व खाजगी शाळेमध्ये पाण्याची पाईप लाईन टाकणे अथवा त्या ठिकाणी बोअरची सोय करुन देणे जरुरीचे आहे. सबब शहरातील रहिवाशी खाजगी नागरी सोसायटया व खाजगी शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय होणेसाठी पाण्याची पाईप लाईन, बोअर घेणे, पाण्याचा निचरा होणेसाठी ड्रेनेजची सोय, रस्ते आदि कामे करण्यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

फक्त खाजगी शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय होणेसाठी पाण्याची पाईप लाईन, बोअर घेणे, पाण्याचा निचरा होणेसाठी ड्रेनेजची सोय, रस्ते आदि कामे करण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १२० ठ. क्र. १६०४
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

माहे मार्च १५ मध्ये मनपाचे सन १५-१६ चे अंदाजपत्रकावर चर्चा करताना मनपाचे उत्पन्न वाढीसाठी अनेक नगरसेवकांनी विविध १८ ते २० उपाययोजना सुचविले होते. महापालिकेच्या विविध खात्यांनी उत्पन्न वाढीसाठी माहे एप्रील १५ ते जून १५ या तिमाहीत कोणकोणते प्रयत्न केले, प्रत्यक्षात किती वसुली झाली याबाबतचा खातेनिहाय तिमाही अहवाल मा. आयुक्तांचे अभिप्रायासह १५ दिवसात सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज१२७ ठ. क्र. २५८६
दि. २९।९।२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेचे दिनांक ३०-३-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत (अंदाजपत्रकीय सभा) ठराव क्र. ३२७ नुसार मंजूर झालेल्या एकूण १८ मंजूर ठरावापैकी दि. ३०-६-२०१५ अखेर या तिमाहीत किती ठरावाची अंमलबजावणी झाली ? अंमलबजावणी न केलेल्या संबंधित खाते प्रमुखावर कोणती कारवाई करण्यात आली या टिपणीसह मा. आयुक्तांनी १५ दिवसात हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेतील विषय क्र. ज १२२ ठ. क्र. ११०४
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सौ. गीताबाई तुळशीदास चिक्का रा. प्लॉट नं. ८२ राजराजेश्वरी नगर, दहिटणे, हैद्राबाद रोड, सोलापूर यांचे राहत्या घरावर दि. ५-५-२०१५ रोजीच्या वादळी वा-यामुळे व पावसामुळे घराशेजारील मोठे झाड सौ. गीताबाई चिक्का यांच्या घराच्या भिंतीवर कोसळले आहे. त्यामुळे घराची भिंत पडून त्यांच्या घरातील सर्व संसारीक साहित्याचे नुकसान झाले आहे. सौ. गीताबाई तुळशीदास चिक्का यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तरी सौ. गीताबाई चिक्का यांना सोलापूर महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 123 ठ. क्र. 218
दि. 28/8/2015 रोजी ठेवला झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बैतुलमाल सिफा कमिटी, शास्त्री नगर, झोपडपट्टी नं. १२३, सोलापूर ही संस्था रजिष्टर्ड असून, संस्थेच्या वतीने शहर जिल्हयातील बेवारस मृताचे अंत्यविधी संस्थेच्या स्वखर्चाने करण्यात येते. यासाठी मोठया प्रमाणात खर्च येत असून, सदरहू संस्था सामाजिक कार्य करणारी असल्याने वरील सामाजिक कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेतील विषय क्र. ९४१ ठ. क्र. ९७८
दि. २८/८/२०१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विजापूर रोडवरील **१)** इंचगेरी महाराज मठ ते राजस्व नगर रोड या रस्त्यास **प्रबुध्द भारत मार्ग** असे नांव देणे **२)** नालंदा नगरकडे जाणारा रस्ता, सुभद्राबाई मंगल कार्यालयाकडे जाणारा रस्ता, आदित्य नगरकडे जाणारा रस्ता या रस्त्यामुळे जो चौक तयार होतो त्या चौकास **नालंदा चौक** असे नांव देणे वरील नमूदप्रमाणे दोन ठिकाणी नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगीक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.९४३ ठ. क्र.९६०
दि. २६।६।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



एन.ए.बी. संचलित निवास अंध कार्यशाळा ही संस्था प्रौढ अंध मुलांचे पुनर्वसन व शिक्षणासाठी सोलापूर जिल्हयामध्ये काम करत आहे. अंधांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून फाईल, खडू, मेणबत्ती, पॅडफाईल, केनिंग खुर्ची विणणे, आदि प्रशिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येते. सदर प्रशिक्षणाच्या माध्यमातून अंध मुले ही आपला व्यवसाय करतात. शासनाच्या धोरणास अनुसरुन महानगरपालिकेने तीन टक्के इतकी तरतूद त्यांचे कल्याणाकरिता केलेली असून, अपंगांना सहाय्य करण्याच्या दृष्टीने या तरतूदीमधून सदर संस्थांच्या माध्यमातून तयार करावयाच्या साहित्यांकरिता लागणारा मटेरियल सोलापूर महानगरपालिका व प्राथमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातून खरेदी करुन देण्यास व शहरातील काही अपंग संस्था जर अशा प्रकारे पुनर्वसन व रोजगार देण्याच्या दृष्टीने कार्य करीत असतील तर अंध बांधवाच्या अशा शैक्षणिक संस्थांनाही महानगरपालिकेच्या वतीने या तरतूदीमधून मदत करण्यांस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

शहरातील सर्व संस्थेमधील अंध, अपंग मुलांकडून तयार होणा-या ज्या वस्तू महानगरपालिकेस लागतील त्या वस्तू आर.सी.रेटप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज१४३ ठ. क्र. ९८?
दि. २९।९।२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



कर्तबगार व्यक्ती तथा ज्येष्ठ समाजसेवक पैंगबरवासी मरहूम मौलाली नन्नूभाई सगरी यांचे समाजकार्य पाहता, त्यांचे युवाशक्तीला आठवण राहण्यासाठी त्यांचे नांव साखरपेठ परिसरातील डॉ. आरकाल हॉस्पीटल पाठीमागील रस्त्यापासून ते बी. वाय. टेलर या मार्गास **पै. मरहूम मौलाली नन्नूभाई सगरी मार्ग** असे नामकरण करणेस तसेच नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेतील विषय क्र. १४४ ठ. क्र. १८२ दि. २९/९/२०१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १९ मधील येलदी कारखाना ते म.न.पा.शाळेकडे जाणा-या रस्त्यास व चौकास **संत ज्ञानेश्वर माऊली चौक** असे नांव देणे वरील नमूदप्रमाणे नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढील विषय क्र. १४५ ठ. क्र. १६३
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुना पुना नाका (धर्मवीर संभाजी चौक) जवळील अचल ॲटोमोबाईल्स व अवंतीनगर समोर नव्याने झालेल्या रोडपासून ते अरविंदधाम पर्यंतच्या रस्त्यास **कै. माधवराव मेंगजी मार्ग** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. १४५ ठ. क्र. १८४ दि. २९/९/२०१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुना कारंबा नाका ते बार्शी टोळ नाक्यापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. कारण शहरातील शिवाजी चौक एस.टी.स्टॅन्ड परिसरामध्ये जी वाहतूकीची कोंडी होते. या रस्त्याचे रुंदीकरणामुळे ते सुटण्यास मदत होणार आहे. बार्शीहून सोलापूर शहरात येणा-या वाहनांचा ५ किलोमिटरचे अंतर कमी होणार आहे. या रुंदीकरणामुळे सम्राट चौकातून मार्केड यार्ड, बाळीवेस यांना देखील जाण्यासाठी सोयीस्कर होणार आहे. बाळे चौकामधील होणारे अपघात कमी होण्यास मदत होणार आहे. सोलापूर शहरात येणारे बाहेरील शालेय विद्यार्थ्यांना व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना देखील हा मार्ग सोयीस्कर होणार आहे. दिवसेंदिवस या परिसरामध्ये लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. याठिकाणी नव्यानेच रो-हाऊसेस, अपार्टमेंट, गृहनिर्माण सोसायटया यांची मोठया प्रमाणावर निर्मिती होत आहे. याच परिसरामध्ये स्वामी विवेकानंद पॉलिटेक्नीक कॉलेज, श्री. ढेपे यांचे कॉलेज व अनेक कॉलेजच्या बसेस याच मार्गाने जातात. शेळगी येथील मित्रनगर, शहरातील पूर्व विभागाकरिता या रस्त्याचा उपयोग होणार आहे. हा रस्ता १२ मिटर रुंदीचा आहे. व मंजूर विकास आराखडयाप्रमाणे रुंदीकरणाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) या योजनेतून हे काम न घेता महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता हा रस्ता व दोन पूल याचे काम शासनाच्या १०० टक्के शासन अनुदान असलेल्या योजनेतूनच करण्यांत यावे. तरी जुना कारंबा नाका ते बार्शी टोळ नाक्यापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणेकरिता प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९४८ ठ. क्र. ९८५
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरामध्ये वडार समाज बांधवांची संख्या मोठया प्रमाणात असून, त्यामध्ये बुधवार पेठेतील परिसरामध्ये वडार समाज बांधव मोठया प्रमाणावर राहतात. त्याच ठिकाणी गुरुवर्य ह.भ.प.श्री. लक्ष्मण महाराज संचलित प्राथमिक शाळा व हायस्कूल चालविले जाते. परंतू समाजातील बांधवासाठी एकही सांस्कृतिक भवन या परिसरामध्ये नाही. तरी सदर ठिकाणी सांस्कृतीक भवन बांधणेकरिता संस्थेचे माजी अध्यक्ष तुकाराम लक्ष्मण अलकुंटे यांनी सिटी सर्व्हे नं. ८७५५/१ ए ही जागा उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. तरी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्रमांक ८ मध्ये गुरुवर्य ह.भ.प.श्री. लक्ष्मण महाराज यांचे नांवे सांस्कृतिक भवन बांधणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

प्लॅन व एस्टीमेट तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९२४ ठ. क्र. ९८६
दि. २९/९/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



आधुनिक शिक्षण प्रणालीनुसार काळाची गरज ओळखून प्रत्येक विद्यार्थी हा संगणक साक्षर झाला पाहिजे, या उध्देशाने सोलापूर शहरातील नू.म.वि. मराठी शाळेत विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करणेकामी संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रामध्ये आवश्यक ते ज्ञान मिळावे व प्रत्येक विद्यार्थ्याला संगणक हाताळण्यासाठी प्रात्याक्षिक व सरावाची गरज आहे. उद्याच्या उज्वल भवितव्यासाठी नू.म.वि. मराठी शाळा, सोलापूर व ज्ञानसागर प्रशाला, सोलापूर या दोन्ही शाळांना प्रत्येकी १० संगणक संच देणेस व सदरचा खर्च भांडवली निधीतून खर्च करणेस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका